Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XI | ISSUE- III | MARCH | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक भावनिक अध्ययन क्षमतेचा शैक्षणिक संपादूणीकीवर होणारा परिणाम एक अभ्यास

श्रीम. मोरे प्रेरणा भगवानराव
संशोधक
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना.

डॉ. मोटे कैलास सर्जेराव
प्राचार्य
रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन, रेणापूर.

प्रस्तावना :

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तसाच तो कृतीशील देखील आहे. समाजात होत असलेल्या बदलांचा त्याच्यावरती परिणाम होत असतो. यामध्ये शिक्षणाचा वाटा मोठा आहे. विद्यार्थ्यांचा बौध्दिक, सामाजिक, भावनिक व शारीरिक विकास होत असताना विविध विकासाच्या आवस्थामधून बालकांला जावे लागते. या काळात विद्यार्थ्यांचे बदल हे त्यांच्या वर्तनातून दिसून येतात. हे विविध बदल हे चांगले किंवा वाईट पण असू शकतात. या बदलामध्ये पालक, शिक्षक व शाळा यांची भूमिका ही महत्वाची आहे. यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते. हे व्यक्तिमत्व चांगले घडविण्यासाठी सामाजिक भावनिक अध्ययन क्षमता विद्यार्थ्यांमध्ये चांगली रुजली पाहिजे.

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक भावनिक अध्ययन क्षमतेचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे सामजिक वर्तन हे त्यांच्या भावनांच्या अविष्कारावर अवलंबून असते. यासाठी विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमताचा विकास होण्यासाठी विविध घटक जबाबदार आहेत. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बुध्दी, तर्क, विचार, कल्पना, समाज या कक्षांचा विकास होणे गरजेचे आहे. तेव्हांच त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्वांचा विकास होणार आहे. सामाजिक भावनिक अध्ययन केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल दिसून येतो. सामाजिक भावनिक अध्ययन क्षमतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादूणीकीवर परिणाम होतो का नाही हे पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधन समस्येची निवड संशोधकाने केली आहे.

समस्या विधान :

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक भावनिक अध्ययन क्षमतेचा शैक्षणिक संपादूणीकीवर होणारा परिणाम एक अभ्यास.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील विविध अध्ययन क्षमतेचा शोध घेणे.
2. सामजिक अध्ययन क्षमतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीवर होणा.या परिणामांचा शोध घेणे.
3. भावनिक अध्ययन क्षमतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीवर होणा.या परिणामांचा शोध घेणे.
4. सामाजिक व भावनिक अध्ययन क्षमतेच्या विकासासाठी अध्ययन कार्यक्रम सूचविणे.

परिकल्पना :

1. सामाजिक व भावनिक अध्ययन क्षमतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीवर परिणाम होतो.

संशोधनाची कार्यपध्दती :

1. संशोधन पध्दती :
   प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक भावनिक अध्ययन क्षमतेचा शैक्षणिक संपादूणीकीवर होणा.या परिणामांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत समस्या ही वर्तमानकालीन असल्याने संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड केली आहे.
2. नमुना निवड :
   जालना शहरातील 10 माध्यमिक शाळेतील 100 विद्यार्थ्यांची असंभाव्यता नमुना निवड पध्दती अंतर्गत सहेतुक नमुना निवड पध्दतीने नमुना म्हणुन निवड केली आहे.
3. संशोधनाची साधने :
   प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने माहिती संकलनासाठी संशोधक निर्मित प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे.

सदरील प्रश्नावली तज्ञ मार्गदर्शकाकडून प्रमाणित करुन घेतली. जालना शहरातील माध्यमिक शाळेतील 100 विद्यार्थ्यांकडून भरुन घेतली आहे.

4. संशोधनाची तंत्रे :
प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे साधन वापरले आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनर्वचन करण्यासाठी संशोधकाने शेकडेवारी या सांख्यिकीय तंत्राचा वापर करुन निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहेत.

संशोधनाचे निष्कर्ष :

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता ही भिन्न स्वरुपाची आहे.
2. 60 टक्के माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सामाजिक क्षमतेचा विकास पूर्ण झालेला नाही.
3. 70 टक्के माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक क्षमतेचा विकास पूर्ण झालेला नाही.
4. समजिक अध्ययन क्षमतेचा माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक वर्तनावर परिणाम होतो.
5. भावनिक अध्ययन क्षमतेचा माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक वर्तनावर परिणाम होतो.
6. 60 टक्के माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास पूर्ण झालेला नाही.
7. 70 टक्के माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा भावनिक विकास पूर्ण झालेला नाही.
8. समजिक अध्ययन क्षमतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीवर परिणाम होतो.
9. भावनिक अध्ययन क्षमतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीवर परिणाम होतो.
10. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सामजिक विकास होण्यासाठी उपक्रम घ्यावेत.
11. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा भावनिक विकास होण्यासाठी उपक्रम घ्यावेत.

शिक्षकांसाठी शिफारशी :

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतेचा विकास होण्यासाठी शिक्षकांनी व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम घ्यावेत.
2. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये सुधारणा हेण्यासाठी विविध मूल्य शिक्षणाचे कार्यक्रम घ्यावेत.
3. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास होण्यासाठी सामजिक कार्य केलेल्या विविध समाजसुधारकांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.
4. विद्यार्थ्यांचा सामाजिक क्षमता विकास व वर्तन सुधारण्यासाठी सामजिक मूल्यांचे विविध उपक्रम राबवावेत.
5. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा भावनिक विकास होण्यासाठी भावनांवर नियंत्रण कसे मिळवावे यासाठी विविध तज्ञांच्या व्याख्यांनाचे आयोजन करावे.
6. भावना नियंत्रणाचे महत्व विद्यार्थ्यांना समजून सांगण्यासाठी विविध चित्रफित दाखवाव्यात.
7. समाजिक व भावनिक क्षमताचा विकास होण्यासाठी क्षेत्रभेट, शिवार फेरी, स्वच्छता, सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये साहभाग, श्रमदान अशा कायक्रमाध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करावे.
8. समजिक व भावनिक क्षमता विकासासाठी दररोज परिपाठामध्ये सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करुन घ्यावे.
9. समाजिक व भावनिक क्षमता विकास होण्यासाठी पालकांना मार्गदर्शन व समूपदेशन करावे.

समारोप :

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक व भावनिक अध्ययन क्षमता ही महत्वपूर्ण आहे. यासाठी माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या सामजिक भावनिक क्षमता सुधारण्यासाठी शिक्षकांनी व पालकांनी विविध उपक्रम घेतले पाहिजे. तेव्हांच विद्यार्थ्यांचा सामजिक भावनिक क्षमतेचा परिपूर्ण विकास होणार आहे.

संदर्भग्रंथसूची :

1. भितांडे, वि.रा.(२००८) शैक्षणिक संशोधन पध्दती, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.
2. घोरमोडे, के.यु.(२००८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूरः विद्या प्रकाशन.
3. पंडित, बन्सी बिहारी (२००८) शिक्षणातील संशोधन, पुणेः नित्य नुतन प्रकाशन.
4. जगताप, ह. ना. (२००८) शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणेः नित्य नुतन प्रकाशन.
5. ठक्कर, पुष्पा (२०१५) भावनिक बुद्धिमत्ता, पुणेः साकेत प्रकाशन.
6. Leader for equity Fhirki app